# 4 आजीसोबतच्या सुट्टीचा अनुभव आजीसोबत सुट्टी


0333CH04





चिराग आणि नंदिनीला त्यांची आजी खूप आवडते. ती त्यांची बेस्ट फ्रेंड आहे. त्यांना तिच्यासोबत खेळायला आणि तिच्याकडून शिकायला खूप आवडते.

तिच्या गोष्टी ऐकणे हा त्यांचा आवडता उपक्रम आहे.



आजी त्यांना एक 'मॅजिक ट्रिक' दाखवते.

तुम्ही तुमच्या रुमालाने काही गोट्या लपवा. तुम्ही लपवलेल्या गोट्यांची संख्या मी तुम्हाला सांगेन.








काय ट्रिक आहे ते तुम्ही सांगू शकाल का?



## आपण सोडवूया

आपल्या मित्रांवर ही ट्रिक वापरा. लपवलेल्या बियांची संख्या खालील तक्त्यात लिहा.

| एकूण बिया | टेबलावरील बिया | लपवलेल्या बिया |
|---|---|---|
| 15 | 12 | |
| 17 | 10 | |
| 19 | 8 | |

| एकूण बिया | टेबलावरील बिया | लपवलेल्या बिया |
|---|---|---|
| 20 | 9 | |
| 23 | 7 | |
| 27 | 12 | |



**शिक्षकांसाठी टीप :** 1 ते 9 दरम्यानच्या संख्या बोला. या संख्या बोलताना त्यात किती मिळवले तर उत्तर 9 येईल ते मुलांनी सांगितले पाहिजे. हा टास्क 10 आणि 20 या संख्यांसोबत पुन्हा रिपीट करा.

© NCERT not to be republished

दोघांनीही आपल्या आजीसाठी खूप गोष्टी आणल्या आहेत.






नंदिनीने आजीच्या आवडीची मिठाई...'बालूशाही' बाहेर काढली.





नंदिनीच्या डब्यात 7 बालूशाही  होत्या

आणि


चिरागच्या डब्यात 5 बालूशाही  होत्या.




संख्यांऐवढे ठिपके काढा.



7 बालूशाही + 5 बालूशाही = .......... बालूशाही








त्याने किती खाल्ल्या? .......... बालूशाही

7 बालूशाही – 5 बालूशाही = .......... बालूशाही

चिरागने आजीसाठी 9 गोष्टींची पुस्तके आणली
आणि नंदिनीने पझलची 7 पुस्तके आणली.
आजीसाठी मुलांनी एकूण किती पुस्तके आणली?



.......... पुस्तके + .......... पुस्तके = .......... पुस्तके

## चला सोडवूया

खालील उदाहरणे सोडवण्यासाठी दहाची फ्रेम वापरा.

(1) 6 + 8 = ............

(2) 5 + 10 = ............

(3) 9 – 6 = ............


(4) 18 – 9 = ............



## चला खेळूया

### पुठ्ठा डाव

*1 ते 10 संख्या लिहिलेल्या कार्डचे चार संच तयार करा. सर्व पत्ते एकमेकांमध्ये मिसळा आणि संख्या लिहिलेली बाजू जमिनीच्या दिशेकडे करून कार्ड जमिनीवर पसरवून ठेवा. आपल्या मित्रांसोबत पाळी पाळीने एका वेळी एक कार्ड उघडा. जेव्हा तुम्ही कार्ड उघडाल तेव्हा स्वतःचे कार्ड आणि आधीच उघडलेली कार्ड पहा. जर कोणत्याही तीन कार्डांनी बेरीज किंवा वजाबाकीचे स्टेटमेंट केले तर तुम्ही तिन्ही कार्ड स्वतःकडे ठेवू शकता. नाहीतर ते कार्ड उघडून खाली ठेवा. उदाहरणार्थ, नंदिनी 4 उघडते. 2 आणि 6 संख्या आधीच उघडण्यात आल्या आहेत. त्यामुळे नंदिनी 2, 4 आणि 6 हे तीनही कार्ड स्वतःकडे ठेवू शकते. सर्व पत्ते उघडेपर्यंत हा खेळ सुरू राहिल. ज्याकडे सर्वात जास्त कार्ड जमतील तो हा खेळ जिंकेल.*




© NCERT not to be republished





नंदिनी आणि चिरागने त्यांच्या मैत्रिणींना आणि आजीला दाखवण्यासाठी त्यांचे काही स्टॅम्प आणले आहेत.




आता त्यांच्याकडे किती स्टॅम्प आहेत?

नंदिनी, चिराग आणि आजी यांनी गिनलडी (Ginladi)चा वापर करून तीन वेगवेगळ्या प्रकारे उत्तर शोधले. :




15 स्टॅम्प + 7 स्टॅम्प = 22 स्टॅम्प

किंवा 15 + 7 = 22



## चला सोडवूया

नंदिनी आणि चिराग यांच्याकडे 2 शिक्के आहेत. आजीच्या भावाने त्यांना त्यांचा 30 स्टॅम्पचा संग्रह दिला. आता त्यांच्याकडे किती स्टॅम्प आहेत?



22 स्टॅम्प + ___ स्टॅम्प = ___ स्टॅम्प

किंवा 22 + ___ = ___


© NCERT not to be republished



त्यांच्याकडे आता 52 स्टॅम्प आहेत. नंदिनी आणि चिराग यांनी मोजल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की त्यांच्याकडे प्रसिद्ध व्यक्तींचे चेहरे असलेले 37 स्टॅम्प आहेत आणि उर्वरित स्टॅम्पवर स्मारकांची छायाचित्र आहेत.

स्मारकांची छायाचित्र असलेले किती स्टॅम्प त्यांच्याकडे आहेत?




त्यांच्याकडे स्मारकांची छायाचित्र असलेले 15 स्टॅम्प आहेत. तुम्ही हे मोजण्याचे इतर मार्ग शोधू शकता का?



52 स्टॅम्प − 37 स्टॅम्प = ◯ स्टॅम्प

◯ − ◯ = ◯


किंवा

37 स्टॅम्प + ◯ स्टॅम्प = 52 स्टॅम्प

◯ + ◯ = ◯




त्यांना आणखी किती स्टॅम्प लागतील? संख्यारेषा वापरून ते शोधा.



◯ स्टॅम्प + ◯ स्टॅम्प = ◯ स्टॅम्प

किंवा ◯ + ◯ = ◯



**शिक्षकांसाठी टीप :** उदाहरणे सोडविण्यासाठी संख्या रेषेवर उडी मारण्याच्या वेगवेगळ्या रणनीतींना संपूर्ण धडा शिकवताना प्रोत्साहन दिले पाहिजे. लहान संख्या वगळून करता येणाऱ्या मोजणीची उजळणी करा.

© NCERT not to be republished


## चला सोडवूया

1. गिनलडी (Ginladi) वापरून सोडवा.


   a. 34 + 6 b. 23 + 12 c. 33 – 5 d. 42 – 15




2. एक बेडूक गिनलडी (Ginladi)वर उडी मारत आहे. तो 7 वर आहे. त्याला एका वेळी 10 मणी उड्या मारायच्या आहेत. तो ज्या मण्यांवर उडी मारेल त्या मण्यांना चिन्हांकित करा आणि त्या संख्या लिहा.




3. हा बेडूक पुन्हा प्रत्येक वेळी 10 ने पुढे उडी मारतो. बेडूक जिथे जिथे उतरेल ती सर्व ठिकाणे चिन्हांकित करा.





4. नाकतोडा प्रत्येक वेळी 10 ने मागे उडी मारतो. ज्या मण्यांवर नाकतोडा उडी घेईल त्या सर्व मण्यांना चिन्हांकित करा आणि त्या संख्या लिहा.





काही मुंग्या मोठमोठी पाने घेऊन आपल्या घरी जात आहेत. ही पाने ते पावसाळ्यात खातील. आजी पानांच्या खाली किती मुंग्या आहेत ते पानांच्या खाली न बघता सांगू शकते. तुम्हीसुद्धा पानांच्या खाली किती मुंग्या आहेत ते सांगू शकता का?

तुमचे उत्तर दिलेल्या बॉक्समध्ये लिहा.






© NCERT not to be republished

**5. सांगितल्याप्रमाणे उड्या मारून तक्ता भरा.**

5 उड्या

| | | |
|---|---|---|
| 34 | 56 | 87 |
| 39 | | 82 |
| | 66 | |
| | | |

6 उड्या

| | | |
|---|---|---|
| 28 | 59 | 73 |
| 34 | | 67 |
| | 71 | |
| | | |

9 उड्या

| | | |
|---|---|---|
| 29 | 12 | 93 |
| 38 | | 84 |
| | | |
| | 39 | |



## चला खेळूया

### नंबर ग्रीडसह स्मार्टपणे बेरीज आणि वजाबाकी करणे


ग्रीड गेम खेळूया. प्रत्येक खेळाडू दोन अंकी संख्या तयार करण्यासाठी दोन वेळा फासा फेकतो आणि तयार झालेल्या संख्येनुसार काउंटरवर फिरतो. ते पुढे किंवा मागे जाणे निवडू शकतात. 91 ते 100 च्या दरम्यान असलेल्या संख्या पहिला गाठणारा विजेता ठरतो!


| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 91 | 92 | 93 | 94 | 95 | 96 | 97 | 98 | 99 | 100 |
| 81 | 82 | 83 | 84 | 85 | 86 | 87 | 88 | 89 | 90 |
| 71 | 72 | 73 | 74 | 75 | 76 | 77 | 78 | 79 | 80 |
| 61 | 62 | 63 | 64 | 65 | 66 | 67 | 68 | 69 | 70 |
| 51 | 52 | 53 | 54 | 55 | 56 | 57 | 58 | 59 | 60 |
| 41 | 42 | 43 | 44 | 45 | 46 | 47 | 48 | 49 | 50 |
| 31 | 32 | 33 | 34 | 35 | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |

© NCERT not to be republished





**शिक्षकांसाठी टीप :** खेळ खेळूताना मुलांना ग्रिडवर दोन संख्यांची बेरीज करण्यासाठी प्रोत्साहित करा. पुढे जाता येत नसेल तर मागे जा. जर दोन्ही करता येत नसेल तर फासा पुन्हा फेका.




23 वरून 34 पर्यंत उडी मारण्यासाठी .......... स्टेप्स लागतील.




त्याला आपला काउंटर योग्य संख्येवर हलविण्यासाठी मदत करा.

1. खालील प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी नंबर ग्रीड वापरा. ग्रीडमध्ये बाण काढून तुमचा विचार दाखवा.

a. नंदिनी 45 वर आहे. तिला 34 मिळाले. ती आता .......... वर पोहोचेल.

b. चिराग 75 वर आहे. त्याला 56 मिळले. तो आता .......... वर पोहोचेल.

c. नंदिनी 30 वर आहे. तिला 66 मिळाले. ती आता .......... वर पोहोचेल.

d. चिराग 89 वर आहे. त्याला 63 मिळाले. तो आता .......... वर पोहोचेल.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 91 | 92 | 93 | 94 | 95 | 96 | 97 | 98 | 99 | 100 |
| 81 | 82 | 83 | 84 | 85 | 86 | 87 | 88 | 89 | 90 |
| 71 | 72 | 73 | 74 | 75 | 76 | 77 | 78 | 79 | 80 |
| 61 | 62 | 63 | 64 | 65 | 66 | 67 | 68 | 69 | 70 |
| 51 | 52 | 53 | 54 | 55 | 56 | 57 | 58 | 59 | 60 |
| 41 | 42 | 43 | 44 | 45 | 46 | 47 | 48 | 49 | 50 |
| 31 | 32 | 33 | 34 | 35 | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |



**शिक्षकांसाठी टीप :** बेरीज (जास्त, जोडणे, एकूण, अधिक) आणि वजाबाकी (कमी, फरक, घट) व्यक्त करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या इतर वेगवेगळ्या शब्दांची मुलांना ओळख करून द्या. मुलांना इतर संख्यांसोबत अशा उड्या मारण्याची संधी उपलब्ध करून द्या आणि त्यांना संख्यांमधला पॅटर्न लक्षात घेण्यास मदत करा.

© NCERT not to be republished

# जादूई बेरीज

नंदिनी आणि चिरागला आजीने सोडवले काही कोडी सापडतात.

संख्यांचे निरीक्षण करा. तुमच्या काय लक्षात येतं?

खालील चौकटी भरा. प्रत्येक पझलमध्ये 1-9 पर्यंतच्या सर्व संख्या आहेत. प्रत्येक ओळीतील सगळ्या संख्यांची बेरीज उजव्या बाजूच्या बॉक्समध्ये दिलेल्या संख्ये एवढी आहे आणि प्रत्येक रकान्यामध्ये दिलेल्या संख्यांची बेरीज खालच्या बॉक्समध्ये दिलेल्या संख्ये एवढी आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | 2 | 8 | 15 |
| 3 | 1 | 6 | 10 |
| 9 | 4 | 7 | 20 |
| 17 | 7 | 21 | |

| | | | |
|---|---|---|---|
| | 5 | 8 | 16 |
| | | | 22 |
| 1 | | 4 | 7 |
| 11 | 16 | 18 | |


| | | | |
|---|---|---|---|
| | 3 | | 12 |
| | 5 | | 15 |
| | 7 | 4 | 18 |
| 7 | 15 | 23 | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 6 | 10 |
| | | | 19 |
| | | 9 | 16 |
| 10 | 12 | 23 | |



प्रत्येक कोड्यातील निळ्या बॉक्समधील आणि लाल बॉक्समधील संख्यांची बेरीज करा. तुम्हाला काय सापडले?

आजी वर्तमानपत्रात काहीतरी करत होती. नंदिनी आणि चिराग यांनी ती काय करतेय ते पाहिले.




*जादू जादू जादू!!*
*1 ते 9 संख्यांसह*
*एका ओळीतील संख्यांची बेरीज करा*
*डावीकडून उजवीकडे*
*आणि वरपासून खालपर्यंत*
*तुम्हाला जादू सापडली का?*
*आता उजवीकडून डावीकडे प्रयत्न करा*
*आणि खालून वरपर्यंत*
*हे जादुई नाही का?*
*अजून काही तरी आहे,*
*आणखी काही तरी*
*कर्णावरील संख्यांची बेरीज करा*
*हे जादुई नाही का?*

जादुई चौकोन पूर्ण करण्यासाठी रिकाम्या जागा भरा


| | | |
|---|---|---|
| | 3 | |
| | | 9 |
| 6 | | |



**शिक्षकांसाठी टीप:** शिक्षक अशीच उदाहरणे तयार करू शकतात आणि मुलांना पझल्स सोडवण्याचे आव्हान देऊ शकतात.


© NCERT not to be republished

नंदिनी आणि चिराग त्यांच्या आजीच्या शेतात गेले आहेत.
आजीकडे दोन शेतं आहेत.




आजीने 25 लाल मुळे आणि 36 पांढरे मुळे लावले आहेत. तिने एकूण किती मुळे लावले आहेत?
नंदिनी हे उदाहरण जमिनीवर रेखाटून सोडवायला सुरुवात केली.

| लाल मुळे | पांढरी मुळे |
|---|---|
| 25 | 36 |




मुळ्यांची एकूण संख्या शोधण्यासाठी आपल्याला 25 आणि 36 यांची बेरीज करणे आवश्यक आहे.






25 लाल मुळे + 36 पांढरी मुळे = ◯ मुळे

25 + 36 = ◯









संख्या रेषेवर हेच उदाहरण सोडवण्याचे इतर मार्ग शोधा.





© NCERT not to be republished

आजीने एका बॉक्समध्ये टोमॅटो आणि गाजर ठेवले आणि त्यावर 100 लिहिले.





नंदिनीने दिलेले उदाहरण रेखाटले.





तुमचा गाजरांच्या संख्येचा अंदाज

............

गाजरांची योग्य संख्या दर्शविणाऱ्या काठ्यांच्या बंडला भोवती वर्तुळ काढा.



वरील उदाहरण संख्या रेषेवर सोडवा.




......... टोमॅटो आणि ......... गाजर एकूण ......... भाज्या

......... + ......... = 100

100 भाज्या असलेल्या बॉक्समधून ......... टोमॅटो काढले,
त्यात ......... गाजर उरले

100 – ......... = .........



**शिक्षकांसाठी टीप :** मुलांना त्यांच्या अंदाज आणि उत्तरांमागे असलेले त्यांचे विचार शेअर करण्यास प्रोत्साहित करा.

© NCERT not to be republished

आजीने नंदिनी आणि चिरागला पिकलेले सफरचंद तोडायला सांगितले.

वाह! किती आहेत हे.







आपण एकूण किती सफरचंद गोळा केले ते पाहूया.


खालील उदाहरणासाठी एक बॉक्स डायग्राम काढा.









एकूण किती सफरचंद?

© NCERT not to be republished

खाली दिलेल्या संख्या रेषेवर उत्तर शोधण्याचा प्रयत्न करा.






85 सफरचंद + 67 सफरचंद = ◯ सफरचंद


85 + 67 = ◯


कोणी सर्वात जास्त सफरचंदं गोळा केली, नंदिनी की चिराग? किती जास्त?

चिराग उदाहरण सोडवण्यासाठी एक बॉक्स डायग्राम काढतो.





नंदिनीचे सफरचंद


चिरागचे सफरचंद




...............ने ............पेक्षा ................. सफरचंद जास्त गोळा केले .



**शिक्षकांसाठी टीप :** अशा प्रकारची अनेक शाब्दिक उदाहरणे तयार करा. मुलांना सहज उपलब्ध असलेल्या साहित्याचा वापर करून ते रेखाटण्यास आणि सोडवण्यास सांगा.

© NCERT not to be republished

प्रथम बॉक्स डायग्राम काढून खालील उदाहरणे सोडवा.

उत्तर शोधण्यासाठी माचिसच्या काड्यांचे बंडल किंवा संख्या रेषेचा वापर करा.

1. बबलीदीदींने सोमवारी 34 तर मंगळवारी 45 पुस्तकांची विक्री केली. दोन दिवसांत तिने किती पुस्तकांची विक्री केली? सोमवारच्या तुलनेत मंगळवारी तिने किती जास्त विक्री केली?
2. रोझरी स्कूलमध्ये झालेल्या क्रिकेट सामन्यात टीम रेडने लंचपूर्वी 56 आणि लंचनंतर 65 धावा केल्या होत्या. त्यांनी एकूण किती धावा केल्या?
3. राम कमांडर शाळेच्या कॅन्टीनमध्ये वडे विकतो. त्याने पहिल्या दिवशी 39 वडे विकले. दुसऱ्या दिवशी त्याने आणखी 12 विकले. या दोन दिवसांत त्याने किती वडे विकले?
4. गेहूने तिच्या टेरेस गार्डनसाठी 56 रोपे आणली. त्यातली काही रोपे सुकून गेली. तिच्याकडे आता 29 रोपे शिल्लक आहेत. तर किती झाडे सुकून गेली?
5. दोन संख्या निवडा. या संख्या वापरून एक शब्दकोडे तयार करा. आपल्या वर्गमित्रांसोबत ते शेअर करा.

..........................................................................................

..........................................................................................



## चला खेळूया

हा खेळ दोन मुलांनी खेळायचा आहे. पहिला खेळाडू 1 ते 10 मधील एक संख्या सांगेल. दुसरा खेळाडू पहिल्या खेळाडूच्या संख्येमध्ये 1 ते 10 मधील संख्या जोडेल. पहिला खेळाडू पुन्हा आधीच्या संख्येत 1 ते 10 मधील संख्या जोडेल. या खेळात पहिला 100 चा टप्पा गाठणारा खेळाडू विजेता ठरतो. एक उदाहरण येथे दिले आहे:

खेळाडू 1 ने ही फेरी जिंकली!

हा खेळ तुमच्या मित्रांसोबत खेळा.

खेळाडू १ ने ही फेरी जिंकली!


आपल्या मित्रांसोबत हा खेळ खेळा.

| खेळाडू 1 | खेळाडू 2 | संपूर्ण |
|---|---|---|
| 9 | | 9 |
| | 10 | 19 |
| 8 | | 27 |
| | 9 | 36 |
| 10 | | 46 |
| | 8 | 54 |
| 10 | | 64 |
| | 10 | 74 |
| 9 | | 83 |
| | 7 | 90 |
| 10 | | 100 |

© NCERT not to be republished

## आपण करूया

1. उत्तराचा अंदाज काढा आणि ते 100 पेक्षा जास्त किंवा कमी आहेत की नाही ते सांगा. बरोबर उत्तराशी जोड्या जुळवा.




| | | |
|---|---|---|
| 134 – 56 | 100 हून अधिक | 68 – 26 |
| 20 + 41 | | 95 + 10 + 5 |
| 150 – 49 | | 109 – 80 |
| 199 – 90 | 100 पेक्षा कमी | 63 + 26 |
| 70 + 30 + 1 | | 124 + 23 + 20 |
| 156 – 65 | | |

2. संख्या रेषेचा वापर करून वरील उदाहरणे सोडवा.
उत्तर उदाहरणाच्या पुढे लिहा.

0 10 20 30 40 50 60 70 80 90 100

50 60 70 80 90 100 110 120 130 140 150

100 110 120 130 140 150 160 170 180 190 200



**शिक्षकांसाठी टीप :** कृपया लक्षात घ्या की संख्या रेषा कोणत्याही संख्येपासून सुरु होऊ शकते. दोन संख्यांमधील अंतर आवश्यकतेनुसार बदलता येते. मुले दोन संख्यांमध्ये समान अंतर न ठेवता खुल्या संख्ये रेषेसोबत देखील काम करू शकतात. संख्या रेषेवर ते घेत असलेल्या उड्या त्यांना लिहायला सांगाव्यात.

© NCERT not to be republished